# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

Email Id : edu.palghar@gmail.com

जा.क्र./पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी- /२०२५/४६८ दिनांक- ०३/०४/२०२५

" प्रसिद्धीपत्रक "

**अनुसूचित जमाती व अन्य कोणत्याही प्रवर्गातील शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणाऱ्या (शासनाने वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताप्राप्त) उमेदवारांना तात्पुरत्या कालावधीसाठी मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने नियुक्तीने पदस्थापना देणेकरिता समुपदेशन प्रक्रिया राबविणेबाबत.**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दि.१५/०७/२०२४ रोजीचे शासन पत्रातील मुद्दा क्र. ३ नुसार अनुसूचित जमाती व अन्य कोणत्याही प्रवर्गातील शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणाऱ्या ( शासनाने वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताप्राप्त) उमेदवारांना तात्पुरत्या कालावधीसाठी मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देणेकरिता शासन स्तरावरून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील दि.१२/०२/२०२४ रोजीच्या पत्रानुसार मान्यता प्राप्त झाली असल्याने या कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरात जा.क्र./ पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी-५४६/ २०२४ /१२४६, दि.१४/०८/२०२४ अन्वये दि.२३/०८/२०२४ रोजीपर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावातील कागदपत्रांची पडताळणी करून पडताळणीअंती **पात्र ठरलेल्या उमेदवारांनी खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार समुपदेशन प्रक्रियेस क्रांतीसूर्य बिरसा मुंडा सभागृह, जिल्हा परिषद पालघर, नवीन प्रशासकीय इमारत, पालघर-बोईसर रोड, कोळगांव, ता. जि. पालघर या ठिकाणी वेळेत उपस्थित राहावे.**

| अ.क्र. | गट | दिनांक | वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | इ. १ ली ते ५ वी | दि. ०७/०४/२०२५ | सकाळी १०:३० वाजता | अनु क्र.१ ते ४३० |
| २ | इ. १ ली ते ८ वी | दि. ०८/०४/२०२५ | सकाळी १०:३० वाजता | विज्ञान/गणित व समाजशास्त्र विषयाचे उमेदवार |
| ३ | इ. १ ली ते ८ वी | दि. ०९/०४/२०२५ | सकाळी १०:३० वाजता | भाषा व भाषा/समाजशास्त्र विषयाचे उमेदवार |

**पात्र यादीतील उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना :-**

१. या कार्यालयामार्फत परिपत्रकानुसार प्रसिद्ध केलेल्या यादीतील पात्र असलेल्या उमेदवारांना जिल्हा परिषद पालघर अंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक व पदवीधर विषयांच्या रिक्त असलेल्या पदांच्या तुलनेतच शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताप्रमाणे समुपदेशनाने नियुक्ती देण्यात येईल.

२. पात्र यादीत नाव समाविष्ट झाले म्हणजे नियुक्ती मिळाली असा पात्र यादीतील उमेदवारांनी समज करू नये.

३. ज्या उमेदवारांना जिल्हा स्तरावरून शाळा किंवा तालुका दिला जाईल अशा सर्व उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी दिलेल्या तालुक्यात किंवा संबंधित शाळेवर हजर होतांना आपली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेबाबतची सर्व मुळ कागदपत्र व ओळखपत्र सोबत ठेवणे बंधनकारक आहे.

४. जे उमेदवार आपली मुळ कागदपत्रांची पडताळणी करून घेणार नाहीत, त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

५. मुळ कागदपत्रांची तपासणी करत असतांना उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे व मुळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती तात्काळ रद्द केली जाईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

६. जे उमेदवार वरील दिलेल्या वेळापत्रकानुसार समुपदेशनास उपस्थित राहणार नाहीत, अशा उमेदवारांच्या जागी यादीतील समुपदेशनास उपस्थित असलेल्या पुढील उमेदवारांस प्राधान्य दिले जाईल, याची सर्व उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

(मनोज रानडे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner